सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

Jannayak Birsa Munda GovernmentMedical College, Nandurbar
जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नंदुरबार.
पत्ता : जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, साक्री रोड, नंदुरबार- 425412.
Website -htpp://gmchnandurbar.comE-Mail:- deangmchnandurbar@gmail.com

जा.क्र.जबिमुंशावैमनं/किरकोळ भांडार /बैठक / 180 /२०२६ दिनांक:-08 /०१/२०२६

## दरपत्रक मागणीपत्र

प्रति,

१.

२.

३.

**विषय:-दरपत्रक मोहोरबंद लिफाफे सादर करणेबाबत...**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून नंदुरबार येथे नव्याने १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे **जननायक बिरसा मुंडा** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय नंदुरबार येथे कार्यान्वित झालेले आहे. महाविद्यालयाचे नाव **जननायक बिरसा मुंडा** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, **नंदुरबार असे झालेले असल्याकारणाने प्रशासकीय कार्यालय तसेच** महाविद्यालयातील **विविध विभागांकरिता कार्यालयीन कामाकाजाकरिता लागणारे रबरी शिक्के बनवून पुरवठा करणे कामी** दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर रबरी **शिक्के बनविण्याचे** दर हे खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे सादर करण्यात यावेत.

| अ.क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| ०१ | रबरी शिक्का प्रती लाईन | |
| ०२ | गोल रबरी शिक्का | |
| ०३ | दिनांक शिक्का | |

त्यास अनुसरुन, प्राप्त झालेल्या मागणीपत्राच्या अनुषंगाने महाविद्यालय अंतर्गत असलेल्या विविध विभागांसाठी **रबरी शिक्के बनवून** पुरवठा करणे करिता मोहोदरबंद लिफाफेमध्ये दरपत्रके मागविण्यात येत आहे. आपला मोहोरबंद दरपत्रकाचा लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्तीनुसार सादर करावा.

### महत्वाच्या अटी व शर्ती

१) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा **दिनांक १६ /०१/२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत** कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही /ग्राह्य धरले जाणार नाही.

२) सूचना फलक/संस्थेच्या संकेतस्थळावर जाहीर नोटीसप्रमाणे इच्छुक कंपनीस देखील दरपत्रक मोहोरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे.

३) दरपत्र मोहोरबंद लिफाफा **"अधिष्ठाता, जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार"** यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यावर पुरवठा करावयाच्या बाबीचा लिफाफ्यावर डाव्या बाजूस

**“दरपत्रक”** लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमूद असणे आवश्यक आहे.

४) दरपत्रक मोहोरबंद लिफाफे ही **दिनांक 20/०१/२०२६ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता** मा.अधिष्ठाता यांच्या दालनात संस्थास्तरावर गठीत समितीसमोर उघडण्यात येतील. आपणास जर दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या प्रक्रियेत सहभाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित राहावे.

५) दरपत्रकातील दर हे दिनांक 20 /01/२०२६ पर्यंत ग्राह्य राहतील. करीता आपणास ग्राह्य दरानेच वस्तुंचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

६) प्रस्तावित पुरवठा/सेवेंकरीता दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक व दर्जा/गुणवत्ता उत्कृष्ठ असेल, अशाच दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

७) सदर पुरवठा बाबीची किंमत, जीएसटी कर व एकूण किंमत असे स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावे. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

८) दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्तऐवज (Document):- अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे. १) दुकानाचा परवाना/व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रक, ३) PAN कार्डची प्रत, ३) अनुभव प्रमाणपत्र, ४) जी.एस.टी. प्रमाणपत्र, ५) आयकर विवरणपत्र

९) सदर पुरवठा आदेश दिल्यानंतर दरपत्रक तसेच पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार पुरवठा विहित मुदतीत करणे आपणावर बंधनकारक राहील. विहित मुदतीत सोबत जोडलेल्या यादीनुसार व विनिर्दिष्ठेनुसार वस्तुंचा पुरवठा न केल्यास द्वितीय न्यूनतम दरपत्रकधारकास पुरवठा आदेश देण्यात येतील.

१०) अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे, अथवा प्राप्त झालेले दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे, तसेच कोणत्याही स्तरावर पुरवठा प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता, **जननायक बिरसा मुंडा** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार) यांनी राखून ठेवलेले आहेत.

अधिष्ठाता,
**जननायक बिरसा मुंडा** शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय,नंदुरबार

प्रत:- १.कार्यालयाच्या सूचना फलक, २. College website